# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Project in Home Economics

### Session: 2019-2020

**Name of the Project:  Project on Principle of Arts**

## Number of Students Enrolled: 15

## Name of Co-ordinator : Prof. Rekha Meshram

**Brief Report on Completion of Project**

**Academic Year- 2019-2020**

| | |
|---|---|
| Name of the Project Undertaken | Project on Principle of Arts |
| Academic Session | 2019-2020 |
| Organizing Department/ Committee | Department of Home Economics |
| Total number of students Participated in the project | 15 |
| Brief Report | The Project entitled Principle of Arts was undertaken by the Department of Home Economics during the session 2019-2020 under the guidelines of the Internal Quality Assurance Cell of the institution. Total 15 students participated in the project activity and successfully completed the project. The completion certificates have been given to the students. All the students found it very interesting to learn through the experiential learning. They enjoyed the project work. |
| Criterion No. I | Metric No:-1.3.2 |

| Signature of Activity Co-ordinator | Signature and Stamp of IQAC Co-ordinator | Signature & Stamp of Principal |
|---|---|---|
| | Co-ordinator, IQAC Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur | Principal Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15 |

## Project on Principle of Arts

Academic Session- 2019-2020

List of students completing project-

| Sr. NO. | Name of students | Program |
|---|---|---|
| 1 | ANCHAL RATNAKAR DEOULKAR | B.A. |
| 2 | ASHWINI MEGHRAJ GADLING | B.A. |
| 3 | ASHWINI MORESHWAR CHHAPEKAR | B.A. |
| 4 | APURVA VILAS WANKHEDE | B.A. |
| 5 | APEKSHA RAJESH NAGDEVE | B.A. |
| 6 | AKANSHA BALU HIRE | B.A. |
| 7 | ALISHA MANSUKH MANIKPURI | B.A. |
| 8 | BHARTI MOPHAN PAKMODE | B.A. |
| 9 | BHAGYASHRI ASHOK DOIFODE | B.A. |
| 10 | DIVYA DURYODHAN HATAGARE | B.A. |
| 11 | DIKSHA SAHEBRAO KURHADE | B.A. |
| 12 | HOMESHWARI ANIL WANKHEDE | B.A. |
| 13 | KAJAL VIJAY MESHRAM | B.A. |
| 14 | KAVITA GANPATRAO KHADSE | B.A. |
| 15 | MONIKA VINAYAK NIMBALKAR | B.A. |

Signatue of Project Co-ordinator    IQAC Coordinator    Principal

Co-ordinator, IQAC
Yashoda Girls' Arts &
Commerce College, Nagpur

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

**Project Copy**



Name of Practical

प्रास्ताविक .

प्रत्येक कलाकृतीमध्ये जसे : मुर्तिकला चित्रकला, गृहसजावट इ. त्यांची निर्मिती करण्याकरीता काही सिद्धांताचा उपयोग करणे आवश्यक असते. या तत्वांच्या सहाय्याने कलाकृतीत सौंदर्य व आकर्षण निर्माण करता येते. कुठल्याही सजावटीत कलेचे मुलघटक जर कलेच्या तत्वानुसार उपयोगात आणले तर सुंदर सजावट होते. केलेली सजावट कलेच्या दृष्टीकोनातुन शोभा आली आहे किंवा नाही हे ठरवणारे घटक म्हणजे कलेची तत्वे आहेत.

व्याख्या - फ्राइड यांच्या मते, "कला म्हणजे आलेल्या वासनेची पुर्ती होय.

आपल्या सुप्त इच्छांची पुर्ती कलाकार कलेद्वारे करतो. आपल्या घराची सजावट करीत असताना गृहीणीला कलेच्या तत्वसंबंधी माहिती असल्यास योग्य प्रकारे सजावट करु शकते. याकरीता कलेच्या तत्वांचे ज्ञान सगळ्यांना मिळणे आवश्यक आहे. कलेची तत्वे एकुण पाच आहेत.

SEAL

Teacher's Signature

Name of Practical

कलेची तत्वे :

1. प्रमाण (Proportion)
2. संगती / अनुरूपता (Harmony)
3. संतुलन (Balance)
4. लय (Rhythm)
5. प्राधान्य (Emphasis)

① प्रमाण (proportion) :

प्रमाणबद्धता हे कलेचे महत्वाचे तत्व आहे. प्रमाणबद्धता ही वस्तुची लांबी, रुंदी किंवा उंची व विविध वस्तुंचे आकार यांच्या परस्पर तुलनेमध्ये प्रदर्शित होते. म्हणुन याला संबंधाच्या नियम असेही म्हणतात. या तत्वानुसार कुठल्याही वस्तुच्या विभिन्न भागांच्या किंवा कुठल्याही एका समुहातील विभिन्न वस्तुंच्या मधे आकर्षक व समाधानकारक संबंध असणे आवश्यक आहे. त्यात आकार, आकृती, रंग, प्रकाश, पोत यातील संबंध असणे आवश्यक आहे. योग्य असावेत.

कोणतेही कलाकृती तयार करीत असताना त्यांच्या विविध भागांमध्ये प्रमाणबद्धता असल्यास ती कलाकृती आकर्षक दिसते. कुठलीही खोली किंवा गृहसज्जेतील प्रत्येक वस्तुचे निर्धारण त्यांच्या प्रमाणाच्या केले पाहिजे. गृहीणीमध्ये प्रमाणबद्ध वस्तु ओळखण्याचे कौशल्य असणे महत्वाचे आहे.

ॲना हॉग रश्या मते, "एका वस्तुच्या विभिन्न भागांच्या किंवा एकाद्य समुहातील विभिन्न वस्तुमधील समाधानपूर्वक संबंधाना प्रमाण असे म्हणतात

क्रेग व रशाच्या मते, "प्रमाण हा एक संबंधाचा नियम असुन त्यानुसार एका जागेची विभागणी आकर्षक रूपाने करून ती एकदुसऱ्याल व संपूर्ण रूपाकरीता संबंधित असतो."

Teacher's Signature ..........

SEAL



SEAL

Name of Practical

घर बांधताना त्यात प्रमाणबध्दता असणे महत्त्वाचे असते. देवळातील खांबांची लांबी, रुंदी, उंची सारखी असेल तर वास्तु भव्य व प्रमाणबध्द दिसते. एखाद्या मोठ्या खोलीत मोठे फर्निचर शोभून दिसते.

कलेची तीन तत्त्वे किंवा बाजु.

गृहसजावटीत प्रमाण या तत्त्वाचा विचार करीत असताना त्याच्या तीन बाजूंचा विचार करणे आवश्यक असते. ती तीन तत्त्वे किंवा बाजु खालीलप्रमाणे.

① प्रमाण आणि रेषा.

रेषा या कलेच्या मूलघटकाच्या योग्य प्रमाणात उपयोग केल्यास प्रमाणबध्दता निर्माण करता येते. वेगवेगळ्या प्रकारच्या रेषांच्या उपयोग करून वेगवेगळे आभास निर्माण करता येतात. उभ्या रेषेमुळे व्यक्तीची नजर उभी व आडव्या रेषेमुळे नजर आडवी फिरते. घराच्या खिडक्या किंवा दारे उभट आकाराचे असतील तर घर उंच वाटते; याउलट घराच्या खिडक्या किंवा दारे रुंद घेतल्यास आणि समोर कमी उंचीची गॅलरी असल्यास घर रुंद वाटते.

वरील दोन ~~चौकटीत~~ चौकनांमध्ये दोन्ही चौकोन सारख्या आकाराचे आहेत. परंतु 'अ' आकृतीत उभी रेषा काढली आहे; त्यामुळे नजर उभी फिरते न 'ब' आकृतीमध्ये आडवी रेषा काढली असल्यामुळे नजर आडवी फिरते. त्यामुळे 'अ' आकृती ही 'ब' आकृतीपेक्षा उंच वाटते.

कलेची तीन बाजू : i) प्रमाण आणि रेषा
ii) प्रमाण आणि अवकाश
अ) समान प्रमाण घेऊन
ब) असमान प्रमाण घेऊन
क) अवकाशाचे प्रमाण कधी समान तर कधी असमान घेऊन
iii) प्रमाण आणि मान / माप.

घरातील दोषही रेषांच्या उपयोग वापराने झाकता येता. कमी उंचीचे घर असल्यास खोलीतील भिंतीवर उभ्या रेषांची सजावट करून किंवा उभ्या आकाराच्या खिडक्या

Name of Practical

लावून दैवीय अभ्यास निर्माण करता येतो.
घराची सजावट करताना रेषांचा योग्य प्रमाणात वापर करून अभ्यास निर्माण करता येतात.

ii)

प्रमाण आणि अवकाश -

घराची सजावट करताना जागेची विभागणी प्रमाणबद्ध करणे महत्वाचे असते. तसेच करीत असताना वेगवेगळ्या वस्तूंमधील मोकळ्या जागेकडे लक्ष देणे गरजेचे असते. दोन वस्तूमधील जागा कमी असल्यास गर्दी झाल्यासारखे वाटते. व जागा खूप जास्त असल्यास एकतेची भावना निर्माण होत नाही. अवकाशात प्रमाणबद्धता असल्यास एकात्मता व विविधता निर्माण करून आकर्षक सजावट करता येते.
अवकाशाचे तीन प्रकारे प्रमाण ठरवतात, ते खालीलप्रमाणे
अ) समान प्रमाण घेऊन - कुठलीही सजावट करीत असताना डिझाईनमध्ये मोकळ्या जागेचे प्रमाण समान ठेवल्यास पुनरावृत्ती होते.
ब) असमान प्रमाण घेऊन - सजावटीत अवकाशाचे प्रमाण वेगळे ठेवल्यामुळे विविधता निर्माण होते.
क) अवकाशाचे प्रमाण कधी समान तर कधी असमान घेऊन - ह्या प्रकारात प्रमाण बदलत असल्यामुळे सजावटीत सारखेपणा नसतो.
अशारीतीने सजावटीत प्रमाणबद्ध अवकाशाचा उपयोग केल्यामुळे एकात्मता तसेच विविधता निर्माण होऊन आकर्षक सजावटीची निर्मिती होते.

iii)

प्रमाण आणि मान / माप

कुठल्याही वस्तूचे योग्य आहे, म्हणजे वस्तूमधील वेगवेगळ्या भागांच्या परस्परांशी योग्य व आकर्षक संबंध प्रस्थापित झालेला असतो. तसेच एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूंबरोबर योग्य प्रमाण असते. वस्तूचे मान लक्षात न घेता सजावट केली तर सौंदर्यनिर्मिती होत नाही.
गृहसजावटीत माप या तत्वाचा चार प्रकारांनी विचार करणे आवश्यक आहे.

Teacher's Signature ..........

Name of Practical

① वस्तुचे व ज्या खोलीत ती वस्तु ठेवायची आहे तिचे मान
② वस्तु व खोलीतील इतर वस्तुंचे मान.
③ वस्तुच्या वेगवेगळ्या भागांचे परस्पर प्रमाण
④ संपूर्ण वस्तुचे प्रमाण.

वरिल चारही बाबींचा विचार केल्यास गृहसजावट चांगली होते एखादी वस्तु ज्या खोलीत ठेवायची असेल त्या खोलीच्या आकाराला शोभेल अशी असावे. उदा. मोठ्या टेबलावर मोठे फुलपात्र. तसे न केल्यास गृहसजावट योग्य वाटत नाही. उदा. छोट्या खोलीत मोठे फर्निचर, लहान टेबलावर मोठा टेबल लॅम्प. सजावट करताना जर एखादा वस्तूचा समुहातील परंतुती मेळ बसत नसेल तर त्या वस्तुला समुहात उपयोगात आणु नये.

<u>संगती</u> (Harmony)

संगती कलेचे असे तत्व आहे, ज्यात सुसंगत वस्तु किंवा विचारांची निवड करुन व व्यवस्थापनाच्या माध्यमातुन एकतेचा प्रभाव उत्पन्न केल्या जातो. " जेव्हा एका समुहातील सगळ्या वस्तुंमध्ये आपसात समानता आढळते. तेव्हा या निवडीमध्ये संगतीच्या तत्वाचा उपयोग केलेला आढळतो कुठलीही सजावट करीत असताना किती प्रमाणात समानता व किती प्रमाणात विविधतेचा उपयोग करावा हे त्या स्थितीवर अवलंबुन असते संगतीमध्ये थोड्या प्रमाणात विरोध असल्यास सजावटीत सुंदरता निर्माण होते. परंतु विरोधाचे प्रमाण अतिशय कमी असावे.

<u>हरीएट व वेटा गोल्डनस्टेन</u> यांच्या मते, "वस्तु व विचारांची योग्य निवड व मांडणी करुन त्यामध्ये एकतेची भावना निर्माण करणारे कलेचे तत्व म्हणजे संगती होय." (Harmony is the Art principle which produces an Impression of unity through the selection and Arrengement of consistent objects and ideas.)

Teacher's Signature ..........

SEAL



Name of Practical

अनुभव नसल्यास संगति साधताना त्रास होतो. परंतु अभ्यास करुन नमुना, नमुना, आकार यांच्या पुनरावृत्तीमुळे संगती स्था नव्याची निर्मिती करता येते

कोणत्याही प्रकारच्या कलेमध्ये संगतिचा विचार पाच दृष्टिकोनातुन करतात ते खालीलप्रमाणे

① रेषा ② आकार ③ पोत ④ कल्पना ⑤ रंग.

① रेषा व संगती -

कुठलीही सजावट करीत असताना रेषांना महत्वपुर्ण स्थान असते. रेषांच्या उपयोगातुन विविध आकारांची निर्मिती केल्या जाते. रेषांच्या योग्य त-हेने उपयोग करुन सजावटीत किंवा कलाकृतीत संगती साधता येते. सजावटीत संगती निर्माण करण्यासाठी पुनरावृत्ती, संक्रमण व विरोधी रेषांचा उपयोग केला जातो.

" ज्या रेषा समांतर असतात अथवा पुन्हा - पुन्हा एकाच दिशेने काढलेल्या असतात तेव्हा त्यांना पुनरावृत्ती रेषा असे म्हणतात

ज्या वेळेस रेषा आडव्या व उभ्या काटकोनात छेद घेऊन विरोधी आकार तयार होतात तेव्हा त्यांना विरोधी रेषा असे म्हणतात. या रेषा संगतिच्या विरुद्ध असतात. विरोधाची आवश्यकता असेल तेव्हा विरोधी रेषांचा उपयोग करतात.

संक्रमण रेषा या डौलदार ~~[illegible]~~ असतात तसेच विरोध कमी करण्यासाठी मदत करतात या रेषांच्या उपयोगाने नजर एका रेषेवरुन दुसऱ्या रेषेवर फिरते.

या तीन प्रकारच्या रेषांच्या साहाय्याने सजावटीत संगती निर्माण केल्या जाते. फर्निचरची मांडणी, पडदे, पुष्परचना इ. ठिकाणी रेषांचा वापर करुन सजावट केल्या जाते

② आकार व संगति -

कुठल्याही सजावटीत संगती साधायची असेल तर वस्तूंचे आकार ठरवणे महत्वपुर्ण असते. सजावटीकरीता उपयोगात येणाऱ्या वस्तूंचे

Teacher's Signature

Name of Practical

आकार वेगवेगळे असतात. मांडणी करताना या वस्तूमध्ये संगती असावी. उदा - बैठकखोलीत खोलीच्या आकारानुसार फर्निचर असावे. मोठे फर्निचर खोलीच्या आकारानुसार लावून टेबल कोठे ठेवावे. यामध्ये काही फर्निचर वेगळ्या कोनात ठेवल्यास विरोध निर्माण होतो. पण हे प्रमाण कमी असावे. खूप जास्त प्रमाणात विरोधीकार वापरल्यास गोंधळ निर्माण होतो

रेषा व संगति -

गृहसजावट करीत असताना रेषांमध्ये संगती साधणे महत्त्वपूर्ण असते. एखाद्या खोलीत एकाच रेषांच्या किंवा सारख्या असणाऱ्या रेषांचा उपयोग केल्यास ती खोली सुंदर दिसते. मध्यम रेषांचा उपयोग खडबडीत किंवा नाजूक रेषांबरोबर करता येतो. परंतु खडबडीत रेषांबरोबर नाजूक रेषांचा उपयोग सजावटीत केल्यास तेथे विसंगति निर्माण होते. म्हणून रेषांचा काळजीपूर्वक वापर करावा. गुळगुळीत रेषांचा वापर जास्त प्रमाणात तर खडबडीत रेषांचा वापर कमी प्रमाणात करावा.

कल्पना व संगति :

संगति साधत असताना गृहसजावटीत कल्पनांचा योग्य प्रमाणात विचार करणे आवश्यक आहे. या कल्पनांमध्ये संगती असावी.
उदा. लहान घरात मोठे व अवजड फर्निचर वापरल्यास गोंधळ होईल तेथे आधुनिक प्रकारचे हलके फर्निचर वापरल्यास संगती निर्माण होईल. गृहिणीजवळ कल्पनाशक्ति असल्यास ती सजावट करायच्या वस्तु व कल्पनांमध्ये एकता निर्माण करू शकते.
उदा. एखाद्या खोलीतील भिंतीवर फोटो लावायचे असल्यास देवांचे निसर्गसौंदर्याचे, नटनट्यांचे, कुटुंबातील व्यक्तींचे फोटो एकत्र लावल्यास सजावट समाधानकारक होणार नाही कारण कल्पनेमध्ये संगती आढळत नाही.

५) रंग व संगति.

गृहसजावट करीत असताना विविध रंगांचा उपयोग करून

Teacher's Signature

Name of Practical

सौंदर्य व आकर्षकता, विविधता निर्माण करता येते. रंगांच्या उपयोग करीत असताना जे रंग एकमेकांजवळ वापरल्यास ते शोभून दिसतात किंवा त्यांच्यामध्ये संगती निर्माण होते. असेच रंग वापरावेत. विविध रंगयोजनांचा वापर करून रंगांमध्ये संगति साधता येते. कुठल्याही खोलीतील फर्निचरचे, पडद्यांचे रंग हे खोलीच्या रंगाला शोभतील असे विन्यास यांच्यात संगति निर्माण होते.

## * ③ संतुलन / समतोल (Balance)

संतुलन हे एक कलेचे महत्त्वाचे तत्त्व आहे. आपल्याला निसर्गात बऱ्याच ठिकाणी संतुलन आढळून येते. त्यामुळे जेव्हा संतुलन साधल्या जात नाही तेव्हा त्याची जाणीव मात्र आपल्याला लगेच होत असते.

सारख्या वजनाच्या वस्तू मध्यबिंदूपासून सारख्या अंतरावर उपयोगात आणल्यास संतुलन साधल्या जाते. सजावट करण्याकरीता ज्या वस्तू वापरल्या जातात. त्या वस्तूच्या दृश्य वजनांची सारखी विभागणी केल्यास त्याला संतुलन असे म्हणतात. प्रत्येक सुंदर वस्तुत आकार, रंग, बनावट यामध्ये संतुलन असणे आवश्यक आहे.

गृहसजावट करीत असताना वस्तूंच्या आकार, संख्या, रंग, नमुने व त्यांच्या मांडणीत संतुलन निर्माण करता येते. सजावटीत योग्य संतुलन साधले असल्यास शांतता व आनंदी वातावरणाची निर्मिती होते.

<u>हॅरीयट</u> व <u>व्हेटा</u> <u>गोल्डस्टिनच्या</u> मते. "संतुलन म्हणजे आराम किंवा विश्रांती आहे. विविध आकार व रंग केंद्राच्या भोवती बाजूला एकत्रित करून आरामदायक प्रभाव प्राप्त केल्या जातो. त्यामुळे केंद्राच्या प्रत्येक बाजूला सारखे आकर्षण निर्माण होते. ("Balance is rest or response. this restful effect is obtained by grouping shapes and colours round a centre in such a way that there equal attractions on each side of the centre.)

Name of Practical

मॅना डॉगरच्या यांच्या मते, "केंद्रबिंदुच्या प्रत्येक बाजुला समान आकर्षणाच्या परीणाम म्हणजे स्थिरता व संतुलनाची भावना होय.

(A feeling of steadiness response and balance in the result of the equalization of attraction on either side of a central point).

वरील व्याख्यावरुन असे म्हणता येईल की मध्यबिंदुपासून सारख्या अंतरावर वस्तुची मांडणी करुन संतुलन साधता येते सजावटीत संतुलन साधण्याकरीता वस्तु कीती प्रमाणात लक्ष वेधुन घेतात हे बघणे गरजेचे असते. जर एखाद्या वस्तुची मांडणी करायची असेल तर त्या मध्यबिंदुपासुन सारख्या अंतरावर ठेवाव्या. पण आकर्षित करण्याची शक्ति कमीजास्त असल्यास त्या मध्यबिंदुपासुन वेगवेगळ्या अंतरावर मांडाव्या. वस्तुचे द्रव्य वजन वस्तुच्या गुणवत्तेवर अवलंबुन असते. वरच्या प्रमाणामुळे तोल किंवा संतुलन साधले जात नसेल तर ते गुणवत्तेमुळे साधता येते.

संतुलनाचे तीन भागात विभाजन करण्यात येते.

1. समान किंवा औपचारीक संतुलन.
2. असमान किंवा अनौपचारीक संतुलन.
3. गोलाकार संतुलन.

(1)

समान संतुलन : जेव्हा केंद्रबिंदुपासुन दोन्ही बाजुला सारख्या आकाराच्या किंवा सारख्या प्रमाणात लक्ष आकर्षुन घेणाऱ्या वस्तुंची मांडणी करुन संतुलन साधण्यात येते. तेव्हा त्याला समान संतुलन असे म्हणतात." यालाच औपचारीक संतुलन असेही म्हणतात. या प्रकारच्या संतुलनामुळे आराम, आनंद व स्थिरतेचा भाव निर्माण होतो. समान संतुलन हे मानवाकृती किंवा जनावरांच्या शरीरात आढळुन येते.

Teacher's Signature ..................

SEAL





Name of Practical

समान संतुलन साधण्याकरीता मध्यबिंदुच्या दोन्ही बाजुला सारख्याच महत्वाच्या किंवा आकाराच्या वस्तु उपयोगात आणतात. समान संतुलन साधणे सोपे असते त्याकरीता फार विशेष कौशल्य लागत नाही.

(2)

असमान संतुलन - "ज्या वेळेस संतुलन साधण्याकरीता विभिन्न आकार किंवा आकर्षणाच्या वस्तु केंद्रबिंदुपासुन वेगवेगळ्या अंतरावर ठेवल्या जातात किंवा अधिक आकर्षण निर्माण करणारी किंवा मोठ्या आकाराची वस्तु केंद्रबिंदु जवळ व छोट्या आकाराची किंवा कमी आकर्षण निर्माण करणारी वस्तु केंद्रापासुन दुर ठेवल्या जाते तेव्हा त्याला असमान संतुलन असे म्हणतात.

अशाप्रकारे संतुलन साधण्याकरीता कौशल्याची व कल्पनाशक्तिची आवश्यकता असते. यामध्ये कोणतेही नियम नसतात. असमान संतुलनात वैविध्य आढळते व त्यामुळे नाविन्याची निर्मिती होते हे संतुलन गती, स्वाभाविकता तसेच औपचारीकतेचा भाव निर्माण करते.

घरातील मांडणीमध्ये संतुलन साधणे आवश्यक असते. याकरीता खोलीतील फर्निचरची मांडणी करीत असताना दारे व खिडक्यांची जागा लक्षात घेतल्यास संतुलन साधता येते. खोलीची सजावट करताना एकच प्रकारचे संतुलन साधण्यापेक्षा दोन्ही संतुलनांचा वापर करावा.

भिंतीवर सजावट करीत असताना समोरासमोरील भिंतीवर सारखे आकर्षण दिसणाऱ्या वस्तुंची सजावट करावी

फर्निचर मांडणी, पुष्परचना, गृहसजावट इ. ठीकाणी आजकाल समान किंवा असमान संतुलनाचा उपयोग केला जातो

गोलाकार संतुलन - हा संतुलनाचाच एक प्रकार आहे. यामध्ये केंद्रबिंदु पासुन गोल आकारात वस्तुंची मांडणी केलेली असते. उदा = फुलांच्या पाकळ्या सायकलचे स्पोक, गोलाकार टेबल इ.

* संतुलन साधण्याकरीता खालील मार्ग अवलंबता येतात

Teacher's Signature ..........

Name of Practical

आकाराचा समतोल - कुठल्याही रचनेच्या मध्यबिंदूतून रेषा आखून वस्तुचे आखल्या दोन भागात विभाजन होते. कलाकारांना हे संतुलन करण्यास आवडते. मानवी शरीर ह्या संतुलनाचा प्रकार आहे.

पोताचा समतोल - निरनिराळ्या पोतांचा वापर करून योजनेत आकर्षकता निर्माण करता येते. परंतु याचे प्रमाण निश्चित असावे. गुळगुळीत पोताच्या जास्त प्रमाणात वापर करून त्यात थोड्या प्रमाणात खडबडीत पोताचा वापर केल्यास वस्तुची आकर्षकता वाढते.

क) रंगांचा समतोल -

कुठल्याही कलाकृतीमध्ये रंगाच्या उपयोग करीत असताना रंगाच्या गुणधर्म लक्षात घेणे आवश्यक आहे. चमकणारे किंवा उष्ण रंग कमी प्रमाणात वापरावे व शांत रंगांच्या जास्त प्रमाणात वापर केल्यास संतुलन साधणे शक्य होते.

* लय (Rhythm)

हे कलेचे महत्वाचे तत्व आहे निसर्गात देखिल अनेक वस्तुंमध्ये लय आढळून येते. उदा. समुद्रलहरी, झऱ्याच्या झुळझुळ आवाज, हृदयाचे ठोके, इ. निसर्ग तसेच कलाकृतीत लय असल्यामुळे यांच्यात आकर्षकता उत्पन्न होते. संगीत व नृत्यामधील लय सर्वांच्या माहितीची आहे.

लय म्हणजे हालचाल होय. लय म्हणजे संबंधित असलेला मार्ग होय. ज्याच्या सहाय्याने रेषा व रंग यावरून नजर सहजपणे फिरु शकते. एखाद्या कलाकृतीमध्ये फिरु शकते. एखाद्या कलाकृतीमध्ये लय असल्यास वातावरणात शांतता व आनंदनिर्मिती होते.

रिकाम्या जागेत लय उपस्थित नसते. पण एखाद्या वस्तुला त्या जागेत ठेवल्यास दृष्टी त्या वस्तुच्या रेषेवरून फिरण्यास सुरवात करते. व यातूनच लयीची निर्मिती होते. कुठल्याही वस्तुच्या मांडणीमध्ये लय उत्पन्न करण्याकरीता खोलीत वस्तुची अशा रीतीने वस्तुंची मांडणी केली पाहिजे की दृष्टी त्यावरून फिरून खोलीतील मुख्य आकर्षण केंद्रावर येऊन खिळेल किंवा थांबेल

Teacher's Signature ..........

SEAL



आवर्तनी पुनरावृत्ती





निरंतर रेषागती

SEAL



Name of Practical

लय विविध प्रकारांनी साधता येते. ते खालील प्रमाणे -
अ) आकाराची पुनरावृत्ती करून
ब) आकारमानात वृध्दी करून
क) निरंतर रेषागती
ड) रंगांच्या उपयोगाने.

अ) आकाराची पुनरावृत्ती करून.
कुठल्याही वस्तुत लय उत्पन्न करण्याचा हा सोपा मार्ग आहे. आकाराची योग्य अंतराने पुनरावृत्ती होते तेव्हा नजर एका भागावरून दुसऱ्या भागावर सहज फिरते व ते वेगवेगळे भाग न वाटता लयबध्द विकास वाटतो. यामुळे सजावटीत एकता निर्माण होते. व्यवहारात या प्रकारची पुनरावृत्ती सर्रास पाहायला मिळते. उदा. कापडावरील नमुने स्वेटरवर लावलेले बटन्स
घराच्या सजावटीत देखील सारख्या आकाराच्या वस्तु वापरून लयबध्दता साधता येते. यामुळे सजावटीत एकतेचा भाव निर्माण होतो. पुनरावृत्ती करताना प्रमाण व अवकाशाचा उपयोग करायला हवा.
ब) आकारमानात वृध्दी करून -
एखाद्या चित्रात किंवा सजावटीत आकारात नियमित वृध्दी करून लय साधल्या जाते. आकारात नियमित वृध्दी केल्यामुळे नजर लहान आकारांवरून मोठ्या आकारापर्यंत लयीत फिरते. परंतु आकारमानातील वाढ प्रमाणबध्द असावी. आकारमानातील वृध्दी योग्य नसल्यास आकृतीत अखंडितपणा न राहिल्यामुळे ती लयबध्द वाटत नाही.
क) निरंतर रेषागती -
अखंड रेषांच्या साहाय्याने लयींची निर्मिती करता येते. योग्य अखंडित रेषांवरोवर नजर फिरते व शेवटपर्यंत नजर पोहोचते. यामुळे सौंदर्यवृध्दी होते

Teacher's Signature ........................

PAGE NO. 26

DATE :

Name of Practical

5) रंगाच्या उपयोगाने -

सजावटीकरीता रंगांची योग्य निवड करून लय साधता येते. एकाच प्रकारच्या रंगाचा वापर करून किंवा विरोधी रंगांचा उपयोग करून, एक रंग हळूहळू फिका करून लय साधता येते.

घराची सजावट करीत असताना लय किती प्रमाणात व कोणत्या भागात असावी हे विचारपूर्वक ठरवावे.

लयीचे दोन प्रकार आहेत.

① नियमानुसार लय ② स्वच्छंद लय :

① नियमानुसार लय -

ही लय निर्माण करण्याची सोपी पद्धत आहे एखाद्या आकारमानाचा वारंवार उपयोग करून ही लय साधता येते. नियमित अंतरावर पुनरावृत्ती केल्यामुळे संपूर्ण कलाकृतीत संबंध प्रस्तापित होतो. पुनरावृत्तीमुळे कलाकृतीत सौंदर्य वाढते, परंतु त्यामध्ये तोचतोचपणा येण्याची शक्यता असते.

② स्वच्छंद लय -

अनियमित अंतरावर विषम रेषांची मांडणी करून जी लय प्राप्त होते. तिला स्वच्छंद लय असे म्हणतात. अनियमित रेषेवरून डोळे सहज फिरतात. स्वच्छंद लयीचा उपयोग संपूर्ण चित्र बघण्यासाठी केला जातो. स्वच्छंद लयीच्या उपयोगामुळे फर्निचर व इतर वस्तु, घरकवस्तु परस्परसंबंधित आहेत असे वाटते.

गृहसजावटीत दोन्ही प्रकारच्या लयीचा वापर केलेला दिसून येतो -

- घराच्या बाह्यस्वरूपात आकर्षकता आणण्यासाठी देखिल लय साधणे आवश्यक असते. घराच्या बाहेरच्या भागातील दरवाजे आणि खिडक्यांची योग्य जागा ठरवून लय साधता येते. परंतु घराची योजना करताना आतील खोल्यांमधील आवश्यकतेप्रमाणे दरवाजे व खिडक्यांची योजना केलेली असते व त्यामुळे बाह्य बाजूने या मांडणीत लय आढळत नाही.

Teacher's Signature

Name of Practical

फर्निचरच्या मांडणीत लय असल्यास ती खोली आकर्षक वाटते फर्निचरच्या आवश्यकतेप्रमाणे त्याचे गटांमध्ये विभाजन करून मांडणी केल्यास त्यावरून सहजपणे नजर फिरते व लयबद्ध मांडणी होते. सारख्या फर्निचरची मांडणी करून त्यात थोड्या प्रमाणात वक्राकार रेषांचा उपयोग केल्यास मांडणी लयबद्ध होते.

* 5) ० प्राधान्य -

प्राधान्य या कलेच्या तत्त्वामुळे कुठल्याही योजनेमध्ये आपली नजर प्रथम एखाद्या विशेष वस्तूकडे जाते. कुठल्याही सजावटीत एखादी प्रमुख वस्तू किंवा वस्तूंच्या समूहाला अशा स्थानावर वापरल्या जाते. की पाहणाऱ्यांची नजर या वस्तूवर सर्वप्रथम व इतर वस्तूंवर नंतर जाते व ती वस्तू आकर्षणाचे केंद्र बनते. यालाच प्राधान्याचे तत्त्व असे म्हणतात.

ॲना हॉंग रच्या मते, "प्राधान्य हे कलेचे असे तत्त्व आहे की ज्यामुळे कुठल्याही योजनेमध्ये प्रभावकारी विचार किंवा रंगाकडे लक्ष केंद्रित केल्या जाते."

Emphasis is the principle that directs us to have a center of interest in any arrangement and a dominating idea, from of colour in any scheme)

सजावट करीत असताना वस्तूचे स्वरूप विचारात घेऊन, आकर्षक वस्तूंची निवड करून योजना केल्यास आकर्षक सजावटनिर्मिती होत असते.

प्राधान्य या तत्त्वाचा उपयोग करीत असताना पुढील चार गोष्टींचा विचार करणे आवश्यक असतो.

① प्राधान्य कशाला द्यावे
② प्राधान्य कसे द्यावे
③ प्राधान्य किती प्रमाणात द्यावे
④ प्राधान्य कुठे द्यावे

Name of Practical

अ) प्राधान्य कशाला द्यावे -

सजावट करीत असताना ज्या वस्तुला प्राधान्य द्यायचे आहे. त्या वस्तुची निवड सर्वप्रथम करावी, नंतर इतर वस्तुंचा विचार करावा त्यानंतर वस्तुच्या साहाय्याने प्राधान्यनिर्मिती करुन आकर्षक सजावट करता येते. कुठल्याही प्रकारची सजावट करीत असताना साध्या पार्श्वभूमिचा उपयोग करावा, हा सामान्य नियम प्राधान्य या तत्वात वापरण्यात येतो. महत्वाची वस्तु प्रत्येक सजावटीत विभिन्न असु शकते. ज्या वस्तुला प्राधान्य द्यायचे आहे. त्या वस्तुचा रंग, आकार व पोत किंवा डिझाइन इ. मध्ये संगती असावी.

ब) प्राधान्य कसे द्यावे.

एखाद्या महत्वाच्या वस्तुची निवड केल्यानंतर त्या वस्तुला प्राधान्य देण्याकरीता वेगवेगळ्या पद्धतीचा उपयोग करता येतो. त्या पद्धती खालीलप्रमाणे.

अ) ज्या वस्तुला प्राधान्य द्यायचे ~~आहे~~ आहे ती वस्तु इतर वस्तुपासुन वेगळी ठेवावी प्राधान्य द्यायच्या वस्तुपासुन योग्य अंतरावर गौण वस्तुंच्या समुहाची मांडणी करावी.

ब) विरोधी रंगांच्या उपयोगामुळे लक्ष आकर्षित होते. म्हणुन प्राधान्य द्यायच्या वस्तुला विरोधी पार्श्वभूमिवर ठेवावे.

क) एखाद्या वस्तुच्या स्थितीमुळे त्या वस्तुला प्राधान्य मिळते सजावटीच्या सर्व वस्तु एखाद्या विशिष्ट स्थितीत असतील व त्यातील एखादी वस्तु वेगळ्या स्थितीत ठेवली तर त्या वस्तुकडे लक्ष आकर्षित होते. उदा. भिंतीवरील सर्व चित्रांची स्थिती उभी आहे व एखादे चित्र आडवे लावल्यास त्या चित्राकडे लक्ष आकर्षित होते.

ड) ज्या वस्तुला प्राधान्य द्यायचे आहे ती वस्तु इतर वस्तुच्या मध्यभागी ठेवल्यास या तत्वाची निर्मिती होते

इ) एखाद्या वस्तुला सजवुन ठेवल्याने ती वस्तु आकर्षक दिसते व प्राधान्यनिर्मिती होते. उदा. कापडावर लेस लाउन भरतकाम करुन किंवा प्रिंटींग करुन आकर्षकता वाढविता येते. नववधुचा साजश्रृंगार.

SEAL

Name of Practical

(फ) एखाद्या वस्तूला इतर वस्तूंपेक्षा अधिक उंचीवर ठेवल्यास किंवा त्या वस्तूची नैसर्गिकरीत्या उंची अधिक असल्यास प्राधान्य देता येते. उदा. एखाद्या कोपऱ्यात टेबल ठेवून त्यावर उभी पुष्परचना ठेवल्यास किंवा आकर्षक टेबललॅम्प ठेवल्यास लोकांचे लक्ष आकर्षित होते.

(ग) ज्या वस्तूला प्राधान्य द्यायचे आहे. त्या वस्तूवर अधिक प्रमाणात प्रकाशकिरणे पडतील अशी योजना करावी. गौण वस्तूंवर कमी प्रमाण प्रकाश असावा. उदा. नाट्यकातील ज्या पात्राला प्राधान्य द्यायचे असेल त्यावर वेगळा प्रकाशझोत सोडल्यास येतो.

(ह) विरोधी रेषांचा वापर करूनही प्राधान्यनिर्मिती करता येते. विरोधी रेषांमुळे त्यात नाविन्य निर्माण होऊन लक्ष आकर्षित होते. उदा.: पेपरमध्ये ज्या बातमीला महत्त्व द्यायचे असेल ती ठळक अक्षरे ठळक किंवा तिरप्या अक्षरात छापतात.

(क) प्राधान्य किती द्यावे :

ज्या खोलीत सजावट करायची आहे त्या खोलीचा आकार व उपयोग लक्षात घेऊन प्राधान्य किती द्यावे हे ठरवावे लागते. मोठ्या भागाला प्राधान्य देऊ नये, अन्यथा तो परिणामकारक होत नाही. प्राधान्य कमी प्रमाणात द्यावे व गौण भाग जास्त प्रमाणात असावा. उदा.: खोलीत सजावट खूप जास्त प्रमाणात केल्यास आकर्षक होत नाही. खोलीतील गौण भाग व प्राधान्य यांचे प्रमाण 3:2 असावे. मोकळ्या साध्या जागेला जास्त भाग तर प्राधान्याला कमी जागा द्यावी

(ड) प्राधान्य कुठे द्यावे -

वस्तूच्या आकर्षण केंद्राचा विचार करून ती वस्तू सर्व बाजूने सारखी दिसेल अशारीतीने ठेवल्यास प्राधान्य देता येते. वस्तू आडवी असल्यास वस्तूच्या मध्यभागी आकर्षण बिंदू असल्यामुळे अशा

SEAL

BHAGWATI
PAGE NO.: 34
DATE:

Name of Practical

वस्तूंना मध्यभागी ठेवावे. प्राधान्य जेवढे जास्त असेल तेवढी त्याच्या सभोवतालची जागा मोकळी असावी.

गृहसजावट कठीन असताना प्राधान्य या तत्त्वाचा योग्य प्रमाणात उपयोग करणे आवश्यक असते. घरातील - बाहेरची सजावट साधी असावी. मुख्य दरवाजाला आकर्षण केंद्र बनवून प्राधान्य उत्पन्न करता येते. प्राधान्य किती प्रमाणात द्यायचे हे खोलीचा आकार व व्यक्तीची आवड यावरही अवलंबून असते.

कलेच्या पाच तत्त्वांचा जर सजावटीत योग्य प्रमाणात विचार-पूर्वक उपयोग केला गेला तर केलेली सजावट ही आकर्षक, नावीन्यपूर्ण व वैविध्य पूर्ण होईल.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce
College, Nagpur

Teacher's Signature ..........